| **विषय क्रमांक-६६७**<br>**दिनांक- ६/०८/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र. नरवि/कावि/३३/२५२ /२०२४ दि.३१ /०७/२०२४ अन्वये, मौजे मोशी मधिल पुणे नाशिक रस्ता ते वडमुखवाडी शिवेपर्यंतचा ९०.०० मी. रुंद रस्त्याने बाधित जमिनीचे भूसंपादन करणेबाबत. |
| **ठराव क्र. ६६७**<br>**दिनांक- ६ /०८/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र. नरवि/कावि/३३/२५२ /२०२४ दि.३१ /०७/२०२४ अन्वये, मौजे मोशी गट नं.४५२ (जुना गट नं.४५०) गट नं.४५९ (जुना गट नं.४५७), गट नं.४४१ (जुना गट नं.४४२), गट नं.६४६ (जुना गट नं.६४९ सरकारी गायराण), गट नं.४४४ (जुना गट नं.४४५), गट नं.४४३ (जुना गट नं.४४४) मधिल पुणे नाशिक रस्ता ते वडमुखवाडी शिवेपर्यंतचा मंजूर विकास योजनेत सुमारे १६५०.०० मी लांबीचा ९०.०० मी. रुंद रस्ता प्रस्तावित करणेत आला असुन सदर रस्त्याने बाधित काही जागा टिडीआर/एफएसआय चे बदल्यात मनपाचे ताब्यात आलेल्या आहेत. शहराचे वाढती लोकसंख्या व त्यामुळे वाढती रहदारी पाहता उक्त रस्त्याचे खालील तक्यात दर्शविलेल्या प्रमाणे भूसंपादन करणे आवश्यक आहे. |

| अ.क्र. | रस्ता/ आरक्षणाचे प्रयोजन | स. नं./ग.नं. | बाधित होणारे संपादन करावयाचे एकुण सुमारे क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|---|
| १. | ९०.०० मी. रस्ता | मौजे मोशी येथील<br>गट नं.४५२ (जुना गट नं.४५०) गट नं.४५९ (जुना गट नं.४५७), गट नं.४४१ (जुना गट नं.४४२), गट नं.६४६ (जुना गट नं.६४९)<br>(सरकारी गायराण),<br>गट नं.४४४ (जुना गट नं.४४५), गट नं.४४३ (जुना गट नं.४४४) | १४८५००.०० चौ.मी. |

तरी उपरोक्त प्रस्तावित प्रयोजनाखालील जमिन महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ व भूमीसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना वाजवी नुकसान भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम - २०१३ (नविन भूसंपादन कायदा २०१३) अन्वये संपादन करणेकामी सदर रस्त्याचा भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी,पुणे यांचेकडे पाठविणेकरिता मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक असल्याने त्यास मा.महापालिका सभेच्या अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे.

| | |
|---|---|
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ६६८**
**दिनांक – ०६/०८/२०२४**

**विषय क्रमांक- ६६८**
**खाते – मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्रमांक-६६८**<br>**दिनांक- ६/०८/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.स्था/प्रकल्प/८८१/२०२४ दि.२/८/२०२४ अन्वये, सांगवी किवळे या रस्त्याचे डांबरीकरण करणे चेंबर समपातळीस करणे व अनुषंगिक कामे करणे या कामासाठी स्थळ बदल करणेच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत. |
| **ठराव क्र. ६६८**<br>**दिनांक- ६ /०८/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.स्था/प्रकल्प/८८१/२०२४ दि.२/८/२०२४ अन्वये, भक्ती-शक्ती किवळे हा बीआरटीएस रस्ता वाहतुकीस खुला करण्यात आल्यामुळे मुकाई चौक, किवळे येथील सबवेमध्ये मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी होत आहे. सदर वाहतुक कोंडीवर उपाययोजना करणेकामी महानगरपालिकेमार्फत वाहतुक सल्लागार मे.स्ट्रीट सर्ज टेक्नोलॉजी प्रा.लि. यांनी सदर चौकाचा अभ्यास करुन मुकाई चौकामध्ये होणा-या वाहतुक कोंडीवर उपाययोजना म्हणुन मुकाई चौक, किवळे व समीर लॉन्स, रावेत येथील दोन्ही सबवे एकेरी वाहतुकीकरीताच खुले ठेवण्याचे सुचविलेले आहे. त्यानुषंगाने दि.०१/०४/२०२४ रोजी मा.पोलिस उपायुक्त, वाहतूक शाखा, मा.कार्यकारी अभियंता (वाहतुक नियोजन विभाग), व इतर संबंधित अधिकारी यांनी प्रत्यक्ष जागेवर स्थळ पाहणी केली आहे. सदर स्थळ पाहणी दरम्यान सल्लागार यांनी सुचविलेप्रमाणे सदर वाहतुक कोंडीवर उपाययोजना म्हणुन मुकाई चौक व समीर लॉन्स येथील सबवे एकेरी वाहतुकीकरीताच खुला ठेवण्याचे नियोजित केले आहे. त्यामुळे मुकाई चौकाकडुन मुंबई कडे जाणारी वाहतुक समीर लॉन्सच्या दिशेने वळवावी लागणार आहे.<br>त्यानुषंगाने मुकाई चौक, किवळे ते समीर लॉन्स, रावेत या भागामधील अस्तित्वातील भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांच्या अखत्यारीतील दोन्ही बाजुच्या सेवा रस्त्यांचे तात्काळ डांबरीकरण करणे आवश्यक आहे.<br>स्थानिक नागरिक व मा.लोकप्रतिनिधी उपरोक्त नमुद भागातील वाहतूक कोंडी कमी करणेकामी इकडील विभागाकडे वारंवार मागणी करत आहेत. त्यामुळे सदर कामाची तातडी लक्षात घेता नकाशात दर्शविल्याप्रमाणे मुकाई चौक सबवे ते समिर लॉन्स सबवे पर्यंत दोन्ही बाजूच्या सेवा रस्त्यांचे डांबरीकरण करणे व इतर अनुषंगिक कामे निविदा क्र.६३/०५/२०२१-२२ च्या बचती मधून करणे शक्य आहे.<br>तरी मुंबई बेंगलोर पश्चिम बाह्यवळण महामार्गावरील मुकाई चौक सबवे ते समिर |

| | |
|---|---|
| | लॉन्स सबवे पर्यंतचे दोन्ही बाजुचे भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांच्या अखत्यारीतील सेवा रस्त्यांचे डांबरीकरण निविदा क्र.६३/०५/२०२१-२२ चे बचतीमधुन करणेबाबत वरील प्रमाणे स्थळबदल करणेच्या प्रस्तावास मा.महापलिका सभेची मान्यता घेणे आवश्यक असल्याने त्यास मा.महापालिका सभेच्या अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ६६९**
**दिनांक – ०६/०८/२०२४**

**विषय क्रमांक- ६६९**
**खाते – मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्रमांक-६६९**<br><br>**दिनांक- ६ / ०८/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र. नरवि/कावि/३३/ २५५ /२०२४ दिनांक - ०५/०८/२०२४ अन्वये, मौजे भोसरी कासारवाडी-नाशिक फाटा ते सी.आय.आर.टी. पर्यंत १८.०० मी. रुंद (H.C.M.T.R) ने बाधित जमिनीचे भूसंपादन करणेबाबत. |
| **ठराव क्र. ६६९**<br>**दिनांक- ६/०८/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र. नरवि/कावि/३३/ २५५ /२०२४ दिनांक - ०५/०८/२०२४ अन्वये, मौजे भोसरी कासारवाडी-नाशिक फाटा ते सी.आय.आर.टी. पर्यंत १८.०० मी. रुंद (H.C.M.T.R) या प्रयोजनासाठी भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी पुणे यांचेकडे पत्र क्र.नरवि/कावि/२अ-१/५३/२००७ दि.२४/१०/२००७ रोजी सादर करण्यात आलेला असून प्रस्तुत भूसंपादनाची कार्यवाही विशेष भूमिसंपादन अधिकारी, विशेष घटक क्र.२, पिंपरी, पुणे -१८ यांचे मार्फत चालू होती.<br>सदर भूसंपादनास व त्याकामी येणा-या खर्चास मा.स्थायी समिती ठराव क्र.१४४९९ दि.०४/०७/२००७ अन्वये मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सदर भूसंपादन करणेकामी संयुक्त मोजणी झाली असून सुसंगत अहवाल पाठविला आहे. परंतु सदर प्रकरणामध्ये कलम ६ ची अधिसूचना भूमि संपादन अधिकारी घटक क्र. (२) यांचेकडुन प्रसिध्द झालेली नसलेने त्या प्रकरणामध्ये नवीन भूसंपादन कायदा २०१३ नुसार भूसंपादन प्रस्ताव सादर करत आहे.<br>त्यानुसार मौजे भोसरी कासारवाडी-नाशिक फाटा ते सी.आय.आर.टी. पर्यंत १८.०० मी. रुंद (H.C.M.T.R) या प्रयोजनासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ |

| | |
|---|---|
| | चे कलम १२६ सह भूमीसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना वाजवी नुकसान भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम -२०१३ (नविन भूसंपादन कायदा २०१३) अन्वये संपादन करणेकरीता मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक असल्याने त्यास मा.महापालिका सभेच्या अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| निर्णय | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ६७०** **विषय क्रमांक- ६७०**

**दिनांक – ०६/०८/२०२४** **खाते – मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्रमांक-६७०**<br><br>**दिनांक- ६ /०८/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र. नरवि/कावि/३३/२५४/२०२४ दिनांक - ०५/०८/२०२४ अन्वये, मौजे भोसरी कासारवाडी येथील (नाशिक फाटा ते भंडारी पेट्रोल पंपापर्यंत) चा १८.०० मी. उच्चक्षमता द्रुतगती महामार्गसाठी (H.C.M.T.R) ने बाधित जमिनीचे भूसंपादन करणेबाबत. |
| **ठराव क्र. ६७०**<br>**दिनांक-६ /०८/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र. नरवि/कावि/३३/२५४ /२०२४ दिनांक - ०५ /०८/२०२४ अन्वये, मौजे भोसरी कासारवाडी येथील सि.स.नं.२०८३ पैकी ते २०९६ पैकी (नाशिक फाटा ते भंडारी पेट्रोल पंपापर्यंत) चा १८.०० मी. उच्चक्षमता द्रुतगती महामार्ग (H.C.M.T.R) या प्रयोजनासाठी भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी पुणे यांचेकडे पत्र क्र.नरवि/कावि/२क/१/१८५/११ दि.१४/०९/२०११ रोजी सादर करण्यात आलेला असून प्रस्तुत भूसंपादनाची कार्यवाही विशेष भूमिसंपादन अधिकारी, विशेष घटक क्र.२, पिंपरी, पुणे -१८ यांचे मार्फत चालू होती.<br>सदर भूसंपादनास व त्याकामी येणा-या खर्चास मा.स्थायी समिती ठराव क्र.११२८७ दि.१५/०६/२०१० अन्वये मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सदर भूसंपादन करणेकामी संयुक्त मोजणी झाली असून सुसंगत अहवाल पाठविला आहे. परंतु सदर प्रकरणामध्ये कलम ६ ची अधिसूचना भूमि संपादन अधिकारी घटक क्र. (२) यांचेकडुन प्रसिध्द झालेली नसलेने त्या प्रकरणामध्ये नवीन भूसंपादन कायदा २०१३ नुसार भूसंपादन प्रस्ताव सादर करत आहे.<br>त्यानुसार मौजे भोसरी कासारवाडी येथील सि.स.नं.२०८३ पैकी ते २०९६ पैकी (नाशिक फाटा ते भंडारी पेट्रोल पंपापर्यंत) चा १८.०० मी. उच्चक्षमता द्रुतगती महामार्ग (H.C.M.T.R) या प्रयोजनासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ सह भूमीसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना वाजवी नुकसान भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम -२०१३ (नविन भूसंपादन कायदा २०१३) अन्वये संपादन करणेकरीता मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक असल्याने त्यास मा.महापालिका सभेच्या अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |

| | |
|---|---|
| निर्णय | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ६७१** **विषय क्रमांक- ६७१**
**दिनांक – ०६/०८/२०२४** **खाते – मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्रमांक-६७१ दिनांक- ०६/०८/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.क्रीडा/०७/कावि/ २१५/२०२४ दि. २/८/२०२४ अन्वये, म.न.पा. च्या हद्दीतील मौजे पुनावळे येथील महापालिकेच्या जागेमध्ये "पिंपरी चिंचवड राष्ट्रीय घोडेस्वारी प्रशिक्षण केंद्र" विकसित करून "पिंपरी चिंचवड राष्ट्रीय घोडेस्वारी प्रशिक्षण केंद्र" हे कृष्णा सामाजिक सेवा प्रतिष्ठाण, थेरगाव,चिंचवड, पुणे – ३३ यांना ०५ वर्षाकरिता प्रशिक्षणाकरिता कराराने चालविण्यास देणेबाबत. |
| **ठराव क्र. ६७१ दिनांक- ०६/०८/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.क्रीडा/०७/कावि/२१५/२०२४ दि. २/८/२०२४ अन्वये म.न.पा. च्या हद्दीतील मौजे पुनावळे येथील सर्व्हे नं. २६/१/६, २६/३/१, २६/३/२ या महापालिकेच्या जागेमध्ये "पिंपरी चिंचवड राष्ट्रीय घोडेस्वारी प्रशिक्षण केंद्र" विकसित करून "पिंपरी चिंचवड राष्ट्रीय घोडेस्वारी प्रशिक्षण केंद्र" हे कृष्णा सामाजिक सेवा प्रतिष्ठाण, थेरगाव,चिंचवड , पुणे – ४११०३३ या संस्थेने ठरविलेली फी आकारून एकूण प्रशिक्षणार्थी संख्येच्या ६०% नागरीकांना त्यांना प्रशिक्षण देणेची मुभा राहील व एकूण प्रशिक्षणार्थी संख्येच्या ४०% मुले/मुलींना म.न.पा. हद्दीतील शाळेतील संबंधित क्रीडा शिक्षक यांचेशी समन्वय साधून राष्ट्रीय घोडेस्वारी खेळासाठी १८ वर्षाखालील पात्र मुलांची निवड करून मोफत प्रशिक्षण देणे बंधनकारक राहील. या अटीवर कृष्णा सामाजिक सेवा प्रतिष्ठाण, थेरगाव,चिंचवड , पुणे – ४११०३३ यांना "पिंपरी चिंचवड राष्ट्रीय घोडेस्वारी प्रशिक्षण केंद्र" ५ वर्ष कराराने चालविण्यास देणेस व ५ वर्षानंतर, पुढील ५ वर्षे मुदतवाढीसाठी प्रस्ताव आल्यास त्याबाबत महासभेमध्ये विचार होणेस मा. महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक असल्याने त्यास मा.महापालिका सभेच्या अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| निर्णय | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ६७२** **विषय क्रमांक- ६७२**
**दिनांक – ०६/०८/२०२४** **खाते – मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्रमांक-६७२**<br>**दिनांक- ६ /०८/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र. सविवि/०२/कावि/१७२/२०२३ दि.०९/०१/२०२४ अन्वये, समाज विकास विभागाचे घटक योजनांमध्ये दुरुस्ती करणेकामी मान्यता देणेबाबत. |
| **ठराव क्र. ६७२**<br>**दिनांक-६ /०८/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र. सविवि/०२/कावि/१७२/२०२३ दि.०९/०१/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिका समाज विकास विभागाचे महिला व बालकल्याण योजना व मागासवर्गीय कल्याणकारी योजना या मुख्य योजनांअंतर्गत येणा-या इ.१२ वी नंतरचे उच्च शिक्षण (प्रथम वर्ष) वैद्यकीय MBBS, BAMS, BHMS, BDS, BUMS, B.Arch, BPTH, B.Pharm, BVSCआणि अभियांत्रिकी पदवीपरीक्षा यांसारखे उच्च शिक्षण घेण्यासाठी अर्थसहाय्य देणे या योजनांमध्ये वैद्यकीय क्षेत्रातील महत्वाचा असणा-या नर्सिंग अभ्यासक्रमा अंतर्गत येणा-या ANM, GNM व B.Sc (Nursing) या कोर्सेसचा समावेश करणेकरीता प्रस्तावा सोबतचे प्रपत्र अ व प्रपत्र ब प्रमाणे दुरुस्ती करणेस मा.महापालिका सभेच्या अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ६७३** **विषय क्रमांक- ६७३**
**दिनांक – ०६/०८/२०२४** **खाते – मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्रमांक-६७३**<br>**दिनांक-**<br>**६ /०८/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र. नगररचना/१०/१६२/२०२४, दि.०६/०८/२०२४ अन्वये, मौजे ताथवडे मधील सार्वजनिक निम सार्वजनिक विभागातील स.नं.३१पैकी, ३२/९/२,३२/१३,३२/१४,३२/१४/1 एकुण क्षेत्र सुमारे 1 हेक्टर ४४ आर जमिन रहिवास विभागात समाविष्ट करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६चे कलम ३७ अन्वये फेरबदल करणेस मान्यता देणे बाबत. |
| **ठराव क्र. ६७३**<br>**दिनांक-**<br>**६/०८/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र. नगररचना/१०/१६२/२०२४, दि.०६/०८/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ताथवडे गावाच्या विकास योजनेस महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३१ ( १ ) अन्वये महाराष्ट्र शासन , नगरविकास विभाग अधिसूचना क्र. टीपीएस – १८१५/२०१२/ प्र. क्रं.-८४/१५/वि.यो. |

| | |
|---|---|
| | मंजुरी/नवि-१३, दि०६/०१/२०१७ व महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग शासन निर्णय क्रं.-टिपीएस-१८१५/२०१२/प्र.क्रं.८४/१५/ई.पी.मंजूरी/नवि-१३ दि.०३/१०/२०१८ मंजुरी मिळालेली आहे.<br><br>मा.सह सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांनी “प्रस्तुत प्रकरणी मा. आमदार श्री. सत्यजीत तांबे यांची विनंती विचारात घेऊन, विषयांकित मौजे ताथवडे ता. मुळशी जि. पुणे येथील सर्वे नंबर ३२/१३, ३२/१४, ३२/९/२(part), ३१ (part) व ३२/१४/१ हि जागा सार्वजनिक निम- सार्वजनिक विभागातून वगळून रहिवास विभागात समाविष्ट करणेसंबंधी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने जागेचे स्थान व परिस्थिती, अस्तिवातील बांधकाम व वापराचे अनुषंगाने विचार विनिमय करुन, जागेचा वापर बदल करणे संबंधी उचित निर्णय घेऊन महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये प्रस्ताव सादर केल्यास, सदर प्रस्तावावर शासनस्तरावर गुणवत्तेनुसार निर्णय घेण्यात येईल” असे संदर्भीय पत्राद्वारे आदेश दिले आहेत.<br><br>पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेनुसार उक्त जमिन सार्वजनिक- निम सार्वजनिक वापर विभागात समाविष्ट आहे. उक्त स.नं. च्या ७/१२ चे अवलोकन केले असता १ हे. ४४ आर क्षेत्र हे ग्रामोदय ट्रस्ट संगमनेर यांचे मालकीचे आहे. जागेवर सद्यस्थितीत त्यांची The Academy School ही शाळा चालू आहे. परंतू शासनाने उक्त अधिनियमातील कलम ३७ अन्वये प्रस्ताव सादर करणेस कळविले असल्याने विद्यमान मैदानाचा वापर अबाधित ठेवून उर्वरीत क्षेत्र रहीवास विभागात बदलणे सोयीस्कर असल्याचे अटीवर शासनास कळविणे गरजेचे आहे.<br><br>सदरहू शाळेच्या सभोवताली विकास योजनेमध्ये रहिवास वापर आहे. सदरहू जागेस ४५.०० मी. रस्ता असून एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीनुसार झोन हा R2 मध्ये येतो. R2 मध्ये सार्वजनिक- निम सार्वजनिक मधील सर्व वापर अनुज्ञेय आहेत. तसेच विद्यमान संस्था हि खाजगी असल्याने कोणता वापर करायचा याबाबतचा निर्णय संबंधित संस्थांचे अधिकार कक्षेत आहे.त्यामुळे भविष्यात शाळा सुरू ठेवून नकाशात दर्शविलेनुसार फक्त खुली जागेमध्ये(शाळा वापरत असलेले विद्यमान खेळाचे मैदान) रहिवास वापरासाठी बांधकाम परवानगी देता येणार नाही.या अटीस अधिन राहून सार्वजनिक- निम सार्वजनिक वापरा ऐवजी रहिवास वापर करणेच्या प्रस्तावास मा.महापालिका सभेच्या मान्यतेनंतर महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये मा.आयुक्त यांचे अधिकारातील सर्व वैधानिक कार्यवाही नगररचना विभागामार्फत सुरू करणेकरिता मा.महापालिका सभेच्या अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ६७४** **विषय क्रमांक- ६७४**
**दिनांक – ०६/०८/२०२४** **खाते – मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्रमांक- ६७४**<br>**दिनांक- ६ /०८/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र. जा.क्र.पापु/कावि/१२७/२०२४, दि.०६/०८/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड शहरातील ६०% भागात अमृत योजनेंतर्गत पुरेशा दाबाने पाणीपुरवठा योजना राबविणे तसेच नजिकच्या भविष्यात विकसित होणा-या भागासाठी पाणीपुरवठा योजना राबविणे व त्यासाठी निविदापूर्व (Pre Tendering) व निविदा पश्चात (Post tendering) कामासाठी कन्सल्टंट / पीएमसी यांची नेमणूक करणे" या कामाचे मुदतवाढीस मान्यता देणेबाबत. |
| ठराव क्र. ६७४<br>**दिनांक- ६ /०८/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र. जा.क्र.पापु/कावि/१२७/२०२४, दि.०६/०८/२०२४ अन्वये, "पिंपरी चिंचवड शहरातील ६०% भागात अमृत योजनेंतर्गत पुरेशा दाबाने पाणीपुरवठा योजना राबविणे तसेच नजिकच्या भविष्यात विकसित होणा-या भागासाठी पाणीपुरवठा योजना राबविणे व त्यासाठी निविदापूर्व (Pre Tendering) व निविदा पश्चात (Post tendering) कामासाठी कन्सल्टंट / पीएमसी यांची नेमणूक करणे" या कामाचा आदेश तांत्रिक सल्लागार मे.डी.आर.ए. कन्सल्टंट लि. यांना दि.०७/०३/२०१९ रोजी देणेत आला आहे. सदर कामाची निविदा पूर्व कार्यवाहीसाठी ३ महिने मुदत आणि निविदा पश्चात कार्यवाहीसाठी २४ महिने मुदत देणेत आली आहे. सल्लागाराची कामाची मुदत हि दि.३०/०६/२०२४ रोजी संपत आहे.<br>पिंपरी चिंचवड शहराची वेगाने वाढणारी लोकसंख्या तसेच पिंपरी चिंचवड शहराची भविष्यात होणारी वाढ व प्राप्त परिस्थितीचा विचार करता रावेत, किवळे, मामुर्डी, च-होली, वडमुखवाडी, डुडुळगाव आणि चिखली इत्यादी परिसरांचे क्षेत्र मोठ्या प्रमाणात असल्याने पाणीपुरवठा विभागाकडील काही प्रमाणात अतिरिक्त कामे करणे गरजेचे आहे. त्यामुळे सदर भागासाठी नव्याने नियोजन करणे, अंदाजपत्रक तयार करणे, निविदा प्रसिध्द करणे, डिझाईननुसार नवीन पाईपलाईन टाकणे, नवीन जलकुंभ उभारणे इत्यादी स्वरुपाची कामे करणेत येत आहेत. या सर्व कामांचे डिझाईन तयार करणे, कामाची गुणवत्ता राखणे, ठेकेदारांच्या बिलांची तपासणी करुन पुढील कार्यवाही करणे, काम चालू असताना देखरेख करणे इत्यादी स्वरुपाच्या कामांसाठी तांत्रिक सल्लागार मे.डी.आर.ए. कन्सल्टंट यांची नेमणूक झाली असून त्यानुसार ते काम करत आहेत. तांत्रिक सल्लागार यांचेकडे निविदा पूर्व आणि निविदा पश्चात अशा स्वरुपाचे कामकाज आहे. नवीन कामांमध्ये निवासी / बिगर निवासी नळ कनेक्शन बदलणे, नवीन पाईपलाईन टाकणे या व्यतिरिक्त २८ उंच पाण्याच्या टाक्या व ३ संप उभारणे इत्यादी स्वरुपाची कामे आहेत. त्या अनुषंगाने एकूण ४ कामांच्या निविदा प्रसिध्द करणेत आल्या असून सदर कामे प्रगतीपथावर आहेत. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे. |

| क्र. | निविदा / कामाची नावे | निविदा क्र. आणि कामाचा आदेश | ठेकेदार | कामाची मुदत | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | पॅकेज १- डुडुळगाव, चोवीसावाडी, वडमुखवाडी व च-होली या ठिकाणी पाण्याची मुख्य नलिका टाकणे, ८ उंच पाण्याच्या टाक्या उभारणे, १ शुध्द पाण्याची टाकी व पंप हाऊस उभारणे व कार्यान्वित करणे. | ११/४-१/२०१९-२०, दि.२८/१२/२०२० | मे. गुडविल कन्स्ट्रक्शन | १) २४ महीने + १२ महिने मुदतवाढ (दि.२७/१२/२०२३ पर्यंत)<br>२) १२ महिने मुदतवाढ (दि.२७/१२/२०२४ पर्यंत) | ९४.५६% काम पूर्ण |
| २ | पॅकेज २ - चिखली व मोशी येथे पाण्याची मुख्य नलिका टाकणे व ३ उंच पाण्याच्या टाक्या उभारणे व कार्यान्वित करणे. | १३/२-१/२०२०-२१ दि.०४/०६/२०२१ | मे.अरिहंत कन्सट्रक्शन | १) ०६ महिने मुदतवाढ (दि.१३/१२/२०२४ पर्यंत)<br>२) ०६ महीने मुदतवाढ (दि.१२/०६/२०२४ पर्यंत) | ९४.४५% काम पूर्ण |
| ३ | पॅकेज ३- वाकड, थेरगाव, से.७/१० व भोसरी या ठिकाणी पाण्याची मुख्य नलिका टाकणे, ९ उंच पाण्याच्या टाक्या उभारणे, १ पंप हाऊस उभारणे व कार्यान्वित करणे. | १३/२-२/२०२०-२१ दि.०१/०२/२०२२ | मे.रुद्राणी इन्फ्रास्ट्रक्चर लि. | १) १२ महिने मुदतवाढ (दि.३१/०१/२०२५ पर्यंत) | ६०.०८% काम पूर्ण |
| ४ | पॅकेज ४- किवळे, से.९६, पुनावळे व ताथवडे या ठिकाणी पाण्याची मुख्य नलिका, ८ उंच पाण्याच्या टाक्या उभारणे, २ शुध्द पाण्याच्या टाक्या व पंप हाऊस उभारणे व कार्यान्वित करणे. | ११/४-४/२०१९-२० दि.०२/०२/२०२१ | मे. एस. एस. साठे | १) २४ महीने + १२ महिने मुदतवाढ (दि.०१/०२/२०२४ पर्यंत)<br>२) १२ महिने मुदतवाढ (दि.०१/०२/२०२५ पर्यंत) | ७१.१७% काम पूर्ण |

वर नमूद केलेली कामे कंत्राटदारामार्फत प्रगतीपथावर असून त्यास अतिरिक्त / वाढीव कालावधी लागणेची कारणे खालीलप्रमाणे आहेत-

- कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावामुळे वेळोवेळी अंमलात आलेले निर्बंध
- स्थानिक लोकांचा कामास वेळोवेळी होणारा विरोध
- पाण्याच्या टाक्यांसाठी जागा उपलब्ध होणेस होणारे विलंब
- अस्थिर बाजारभावांमुळे कंत्राटदाराकडून पाईप मटेरीअल खरेदी करण्यास झालेला उशीर
- पाईपलाईन टाकण्यासाठी विविध विभागाकडील आवश्यक परवानग्या मिळण्यास लागणारा उशीर

सदरील कामे करताना आलेल्या अडीअडचणींमुळे काम पूर्ण करण्यासाठी झालेल्या विलंबामुळे शिल्लक कामे पूर्ण करण्याकरीता मे.गुडविल कन्सट्रक्शन या ठेकेदारास दि.२७/१२/२०२४, मे.अरिहंत कन्सट्रक्शन्स यांना दि.३१/१२/२०२४, मे.रुद्राणी इन्फ्रास्ट्रक्चर

| | |
|---|---|
| | लि. यांना दि.३१/०१/२०२५ व मे.एस.एस.साठे यांस दि.०१/०२/२०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.<br>एकंदरीत सदर पॅकेजेस ची शिल्लक कामे पूर्ण करणेकरिता एप्रिल-२०२५ पर्यंतचा कालावधी लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे सदरची ४ कामे साधारणतः एप्रिल-२०२५ अखेर पर्यंत चालू राहणार आहेत. त्यामुळे तांत्रिक सल्लागार यांनी पत्रान्वये दि.३०/०४/२०२५ पर्यंत मुदतवाढ मिळणेकामी विनंती केली आहे.<br>सदर प्रकल्पांतर्गत २८ पैकी एक पाण्याची टाकी कार्यान्वित होऊन पाणीपुरवठा चालू आहे. ६ पाण्याच्या टाक्यांची RCC कामे पूर्ण झाली असून टेस्टिंग व पेंटिंग ची कामे शिल्लक आहेत. मुख्य जलवाहिन्यांच्या एकूण ६१.१६ किमी पैकी ४६.८ किमी काम पूर्ण झाले असून १४.३६ किमी चे काम प्रगतीपथावर आहे. १०२ किमी च्या वितरण नलीकेच्या कामापैकी ९२ किमी चे काम पूर्ण झाले असून उर्वरित १० किमी चे काम प्रगतीपथावर आहे. तसेच सदर पाईपलाईनची hydrotesting, interconnections, commissioning ई. कामे शिल्लक आहेत.<br>वर नमूद केलेली कामे पूर्ण होईपर्यंत सदर प्रकल्पांतर्गत कामावर देखरेख ठेवणे, कामाची गुणवत्ता ठेवणे व बिल अदायगी कामी सल्लागार मे. डी. आर. ए. कन्सल्टंट यांना मुदतवाढ देणे आवश्यक वाटते. सल्लागाराला कामाचे आदेश दि.०७/०३/२०१९ रोजी देण्यात आलेले आहेत. सदर कामाची निविदा रक्कम रु.४,१३, ०६,४५२/- इतकी होती. सदर पॅकेज -१ ते पॅकेज -४ निविदांमधील शिल्लक कामे पूर्ण करणे गरजेचे असून सदरील कामे पूर्ण करण्यासाठी Project Management Consultancy (PMC) सर्व्हिसेसच्या कामांसाठी र.रु .१,९८,९०,०००/- कोटी इतक्या वाढीव निधीची आवश्यकता आहे .त्यामुळे निविदा रक्कमेपेक्षा र.रु १,९८,९०,०००/- इतक्या वाढीव खर्चास मान्यता मिळणे आवश्यक आहे.<br>वरील सर्व बाबींचा विचार करून सल्लागाराने १० महिने मुदतवाढीची मागणी केलेली आहे. वरील सर्व बाबी विचारात घेता, सल्लागाराचे प्रकल्पांतर्गत असलेली कामे आणि सर्विसेस पूर्ण करण्यासाठी होणारा विलंब तसेच यासाठी लागणाऱ्या अधिकच्या कालावधी कामी सल्लागारांनी केलेली मुदतवाढीची मागणी काम पूर्ण होणेचे दृष्टीने सकारात्मक असलेचे निदर्शनास येत आहे. तसेच प्रकल्पांतर्गत चालू असलेली कामे विविध अडचणींमुळे पूर्ण करण्यास होणारा विलंब लक्षात घेता, सुरु असलेली कामे करण्यासाठी मुदतवाढ द्यावी लागेल असे दिसून येत आहे. यास अनुसरून सल्लागाराची Project Management Consultancy (PMC) सर्व्हिसेसचा कालावधी जी वरील कामाशी निगडीत आहे, ची मुदतवाढ ३०/०४/२०२५ पर्यंत करणे गरजेचे आहे. तसेच ठेकेदारांचे Final Bill, Project commissioning, Handing Overइ. कामासाठी देखील अधिकचा वेळ लागणार आहे. या पार्श्वभूमीवर सल्लागाराचे कामाची मुदत ही,मूळ टेंडर अटी-शर्तींनुसार दि.३०/०४/२०२५ पर्यंत मुदतवाढ देणे आवश्यक आहे .<br>सदर प्रकल्पाच्या निविदा अंतर्गत व महानगरपालिकेच्या अंतर्गत चालू असणारी कामे व |

| | |
|---|---|
| | व्याप लक्षात घेता, Project Management Consultancy (PMC) सर्व्हिसेसच्या कामाच्या निविदा रकमेच्या होणाऱ्या वाढीव खर्चास (कामाच्या रकमेच्या आदेशापेक्षा अंदाजे र.रु. १,९८,९०,०००/- जादा) खालील प्रमाणे मान्यता देणे आवश्यक आहे.<br>१. सल्लागाराचे प्रकल्पांतर्गत असलेली कामे करून घेण्यास, आहे त्या निविदा अटी व शर्ती नुसार दि.३०/०४/२०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यास मान्यता मिळणे.<br>२. सल्लागाराचे सर्विसेंसच्या कामाच्या निविदा रकमेच्या होणाऱ्या वाढीव खर्चास (कामाच्या रकमेच्या आदेशा पेक्षा अंदाजे र.रु. १,९८,९०,०००/- जादा) यास मान्यता मिळणे आवश्यक आहे.<br>तरी, वरील कामाची मुळ अंदाजपत्रकीय रक्कम रु.४.१३ कोटी इतकी असून वाढीव र.रु. १.९९ कोटी सह एकूण र.रु. ६.१२ कोटी इतकी होत आहे. त्यामुळे सदर कामे निविदा अटी व शर्तीनुसार कराव्या लागणा-या खर्चास सुधारीत तांत्रिक मान्यता व प्रशासकीय मान्यता देणेस मा.महापालिका सभेच्या अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

सही/-
(चंद्रकांत पोपट इंदलकर)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

**सही/-**
**(शेखर सिंह)**
**मा.प्रशासक**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**